# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
## परिपत्रक क्र. : ९२

क्र. झोपुप्रा./अभि./११६३४
दिनांक : 19 JAN 2009

विषय : सार्वजनिक जमिनींचे बाबतीत भाडेपट्टा करार [लिज] व खाजगी जमिनींचे मालकीचे हस्तांतरण [कन्व्हेअन्स] करणेबाबत.

------

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पुनर्वसन व विक्री घटकाच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या नावे भाडेपट्टा करार देण्याची कार्यवाही ही झोपडपट्टी ज्या सार्वजनिक संस्थेच्या मालकीची असेल त्यांनी विकास नियंत्रण नियमावली ३३ [१०] मधील परिशिष्ट-४ मधील नियम क्र. १.११ अनुसार व शासनाने झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याकरीता व कार्यपद्धतीमध्ये सुलभता आणण्यासाठी केलेल्या इतर उपाययोजनांनुसार कार्यवाही करावयाची आहे. तसेच खाजगी जमिनीवरील योजनांमधील सहकारी गृहनिर्माण संस्थेचे नावे मालकी हक्क हस्तांतरण [कन्व्हेअन्स] करण्याची कार्यवाही विकासकाने करावयाची आहे. या संदर्भात योग्य ती अट आशयपत्रामध्ये अंतर्भूत करण्यात येऊन त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी
[झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण]